शनिवार दि.७ सप्टेंबर२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३७१
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# देवस्थानांच्या विकासासाठी २७५ कोटी
# शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी

## बीड,जालना,नागपूर अन् कोल्हापूरमध्ये सुशोभीकरण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

श्री चक्रधर स्वामी यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून महानुभाव पंथाच्या रिद्धपूर, भिष्णूर, जाळीचा देव, पोहीचा देव, पांचाळेश्वर या देवस्थानांसह राज्याच्या ग्रामीण भागातील ८ देवस्थानांच्या सुमारे २७५ कोटींच्या विकास आराखड्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

या विकास आराखड्यांच्या यशस्वी अंमलबजावणीतून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाच्या पर्यटन विकासाला चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला आहे. राज्यातील ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्र, देवस्थान विकास शिखर समितीची बैठक आज मंत्रालयात पार पडली. बैठकीला मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अतिरीक्त मुख्य सचिव विकास खारगे, नियोजन विभागाचे अतिरीक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अतिरीक्त मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव जयश्री भोज यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे (एज्ञपरींह डहळपवश) म्हणाले, यंदाचे वर्ष हे श्री चक्रधर स्वामींचे अष्टशताब्दी जन्मोत्सव वर्ष आहे. तसेच आज त्यांची जयंती आहे. यानिमित्ताने महानुभाव पंथाच्या देवस्थानांच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. भक्तीधाम प्रल्हादपूर येथील श्री संत गुलाबराव महाराज तीर्थक्षेत्र विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, यासाठी दोन टप्प्यात प्रस्ताव



सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच संत सावता माळी यांचे गाव असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील अरण या गावाला अ वर्ग तीर्थक्षेत्र जाहीर करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

या बैठकीत ग्रामविकास विभागाच्या अमरावती जिल्ह्यातील श्री संत गुलाबराव महाराज तीर्थक्षेत्रासाठी पहिल्या टप्प्यासाठी २५ कोटी, रिद्धपूर तीर्थक्षेत्रासाठी १४.९९ कोटी, बीड जिल्ह्यातील श्री पांचाळेश्वर तीर्थक्षेत्रासाठी ७ कोटी ९० लाख, श्री क्षेत्र पोहीचा देव तीर्थक्षेत्रासाठी ४ कोटी ५४ लाख, जालना जिल्ह्यातील जाळीचा देव तीर्थक्षेत्रासाठी २३ कोटी ९९ लाखाच्या वर्धा जिल्ह्यातील श्री गोविंद प्रभू देवस्थानासाठी १८ कोटी ९७ हजाराच्या विकास आराखड्यास मंजूरी देण्यात आली. तसेच पर्यटन विभागाच्या नागपूर जिल्ह्यातील धापेवाडा येथील श्री विठ्ठल मंदिर देवस्थानाच्या विकासासाठी १६४.६२ कोटींच्या आणि कोल्हापूर जिल्ह्यातील वडणगे येथील शिव पार्वती तलावाच्या सुशोभीकरणासाठी १४ कोटी ९७ लाखाच्या निधीला मंजूरी देण्यात आली.

- ✻ श्री क्षेत्र रिद्धपूर, ता. मोर्शी, जि. अमरावती (२५ कोटी मंजूर)
- ✻ श्री क्षेत्र पांचाळेश्वर ता. गेवराई, जिल्हा बीड (७.९० कोटी मंजूर)
- ✻ श्री क्षेत्र पोहीचा देव, कोळवाडी, ता. जि. बीड (४.५४ कोटी मंजूर)
- ✻ श्री जाळीचा देव, ता. भोकरधन, जिल्हा जालना (२३.९९ कोटी)
- ✻ श्री गोविंद प्रभू देवस्थान, भिष्णूर, ता. आष्टी, जिल्हा वर्धा (१८ कोटी)

### फडणवीसांनीही व्यक्त केला आनंद

राज्य सरकारच्यावतीने भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींना अनोखे नमन करण्यासाठी मला हे सांगताना आनंद होतो की, त्यांच्या जीवनकार्याशी संबंधित तसेच महानुभाव पंथाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या एकूण ५ देवस्थानांच्या विकास आराखड्यांना आज मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि माझ्या उपस्थितीत झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी प्रदान करण्यात आली. हे पाचही मिळून एकूण ७८ कोटी रुपयांचे आराखडे आहेत, त्याचा तपशील पुढीलप्रमाणे

## माजी राज्यमंत्री सुरेश धस यांच्या प्रयत्नातून आष्टी मतदारसंघातील ३५ ग्रामपंचायत इमारत बांधकामास मंजूरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

बीड जिल्ह्यातील ग्रामपंचायतच्या स्वतःच्या इमारती नसलेल्या १२६ ग्रामपंचायतींना माजी ग्रामविकास मंत्री आमदार पंकजाताई मुंडे यांच्या प्रयत्नातून स्वतंत्र ग्रामपंचायत इमारत बांधकामास स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेअंतर्गत शासन निर्णय दि.१६ ऑगस्ट २०२४ नुसार देण्यात आली असून..या अपूर्व योगदानाबद्दल माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांचे आभार व्यक्त केले आहेत अशी माहिती देताना सुरेश धस आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले की,ग्रामपंचायत म्हणजे गावची संसद असते..आजवर आपल्या जिल्ह्यातील अनेक गावांना स्वतःची वेगळी ग्रामपंचायत इमारत नव्हती.त्यामुळे माजी ग्रामीण विकास मंत्री लोकनेत्या आ.पंकजाताई मुंडे यांच्या प्रयत्नांतून.. बीड जिल्ह्यातील.. १२६ स्वतंत्र ग्रामपंचायतींना त्यातील आष्टी विधानसभा मतदारसंघासाठी आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील ३५ ग्रामपंचायतींना इमारत बांधकामास ७ कोटी ४० लक्ष रुपये मंजुरी मिळाली आहे.



याबाबत दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी शासन निर्णया द्वारे राज्यातील ज्या ग्रामपंचायतींना स्वतःच्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही अशा ग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालयाची इमारत बांधण्यासाठी मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना अंतर्गत माजी मंत्री सुरेश धस यांच्या प्रयत्नांने आष्टी तालुक्यातील नांदा-२० लक्ष,पारोडी-२० लक्ष,देसुर- २० लक्ष,शेकापुर- २० लक्ष, पांगुळगव्हाण- २० लक्ष,कानडी बु.- २० लक्ष,केळसांगवी- २० लक्ष,प्रिंप्रीघाटा- २० लक्ष,पोखरी- २० लक्ष,म्हसोबाचीवाडी- २० लक्ष,मांडवा- २० लक्ष, साबलखेड- २० लक्ष, शेडाळा- २० लक्ष,सांगवीपाटण- २० लक्ष,किन्ही- २५ लक्ष,खिळद- २५ लक्ष,दैठणा- २५ लक्ष,पिंपळगावघाट- २५ लक्ष,पिंप्री घुमरी- २५ लक्ष, पाटोदा तालुक्यातील निवडुंगा- २० लक्ष,बेदरवाडी- २० लक्ष,मांझरीघाट- २० लक्ष,निरगुडी- २० लक्ष, काकडहीरा- २० लक्ष,वाघिरा- २० लक्ष,येवलवाडी- २० लक्ष,गवळवाडी- २० लक्ष,सोनगाव सौंदाना २० लक्ष, सावरगाव सोने २० लक्ष,डोंगरकिन्ही २५ लक्ष,नाळवंडी २५ लक्ष, दासखेड २५ लक्ष शिरूर कासार तालुक्यातील माळेगाव चखला २० लक्ष,राळेसांगवी २० लक्ष, ब्रम्हनाथ येळंब २० लक्ष आष्टी, पाटोदा, शिरूर कासार विधानसभा मतदारसंघातील ३५ ग्रामपंचायतींना ७ कोटी ४० लक्ष रुपये निधी स्वतंत्र ग्रामपंचायत इमारतीसाठी मंजूर करून बीड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना इमारत बांधकामासाठी मंजुरी करण्याच्या अपूर्व योगदानाबद्दल महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन,आ.पंकजाताई मुंडे यांचे माजीमंत्री सुरेश धस यांनी विशेष आभार व्यक्त केले आहेत.

## लोहा येथे एकनाथ दादा पवार यांच्या प्रचारासाठी खा.राऊत यांची जाहीर सभा

### शिवसेना (उ.बा.ठा.)च्या कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन-उपतालुकाप्रमुख संतोष पाटील कापसीकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**



शिवसेना पक्षप्रमुख उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाची मुलूख मैदाणी तोफ ,गद्दाराच्या टोळीला पुरून उरणारा लढवय्या शिवसैनिक मा.खासदार संजय राऊत यांची कंधार लोहा विधानसभेचे अधिकृत उमेदवार एकनाथ दादा पवार यांच्या प्रचारार्थ लोहा येथे दिनांक १२ सप्टेंबर २०२४ रोज गुरूवारी सकाळी ठीक ११:०० वाजता राधाई मंगल कार्यालय,मेन रोड लोहा येथे जाहीर सभेचे आयोजन केले आहे . तरी कंधार लोहा विधानसभा मतदारसंघातील शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष्यांच्या कार्यकर्त्यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संतोष पाटील कापशीकर ( शिवसेना लोहा उपतालुकाप्रमुख ) यांनी केले आहे.

कंधार लोहा विधानसभा मतदारसंघांमध्ये एकनाथ दादा पवार यांनी मतदारांच्या भेटी गाठी घेऊन सर्वसामान्य जनतेच्या समस्या जाणून ,त्यांचे निराकरण केले आहे. शिवसेना ( उबाठा) पक्षाचे नाव तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली आहे. या भागातील मुलभूत सुविधा कशा प्रकारे सोडविता येतील याचा अभ्यास एकनाथ दादा पवार यांनी जवळून केला आहे. गत पाच सहा दिवसांपूर्वी झालेल्या संततधार व जोरदार पावसाने शेतकऱ्यांचे कमरंडे मोडले आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या खरिपाच्या पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्यावी अशी मागणी केली आहे. दि.१२ रोजी होणाऱ्या भव्य दिव्य कार्यक्रमात कंधार लोहा विधानसभा मतदारसंघाचे फिक्स आमदार एकनाथ दादा पवार यांच्या वर विश्वास ठेवून किरण पाटील गव्हाणे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्ते शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश करणार आहेत.गरीबांच्या मदतीला धावून जाणारे ,गरीबीची जाण असणारे आपले हक्काचे आमदार आपल्याला करायचे आहे तरी हजारो कार्यकर्त्यांनी लोहा येथील जाहीर सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन संतोष पाटील कापसीकर शिवसेना (उ.बा.ठा.) पक्षाचे लोहा उपतालुकाप्रमुख यांनी केले आहे.

> “येथे होणाऱ्या खा. संजय राऊत यांच्या सभेकडे मतदारसंघातील अनेकांचे लक्ष लागले आहे. सध्या वरूणराजा शेतकऱ्यांच्या मुळावर असल्याने सरकारचे लक्ष वेधण्यासाठी व लाडकी बहिण योजनेवर खा. राऊत काय भाष्य करणारा याकडे मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

## मराठा समाजाला आम्ही आरक्षण दिले:मुख्यमंत्री शिंदे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**


मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत मराठा आरक्षणावर भाष्य केले आहे. यावेळी बोलताना ते म्हणाले, सगे सोयरेचा विषय कायद्याच्या चौकटीत बसवण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी काढलेल्या अधिसूचनेवर ८ ते १० लाख आक्षेप आले आहेत. त्याचा अभ्यास केला जात आहे.

## चारोळी

एक तरी अशी जागा असावी
जिथं मन हलकं होईल
दु:खाला वाट मोकळी अन
मन मोरपीसी होऊन जाईल.

**रंजना सानप**
**मायणी (सातारा)**

## ज्ञानेश्वर चिभडे यांची पंचायत राज तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शिवसेनेकडून सत्कार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**


लोणार ज्ञानेश्वर चिभडे मामा यांची राजीव गांधी पंचायत राज समितीच्या तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल महाविकास आघाडीचे घटक पक्ष शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछीरे यांच्या कडून सत्कार

शिवसेना भवन लोणार येथे पार पडलेल्या सत्कार सोहळ्यात ज्ञानेश्वर चीभडे यांच्या कार्याची गुरु गौरव करून राजीव गांधी पंचायत राज समितीच्या तालुका अध्यक्षपदी निवड झाली त्याबद्दल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछीरे, शहर प्रमुख गजानन जाधव यांच्या वतीने सत्कार समारंभ घेण्यात आला याप्रसंगी ज्येष्ठ शिवसैनिक सुदन अंभोरे, अल्पसंख्यांकाचे तालुकाप्रमुख उमर सय्यद, अशोक सरदार, गणेश पाठे, यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते चिभडे मामांच्या निवडीबद्दल समाजाच्या सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.




संपादकीय

# आनंदाचे होऊ वितरक...



लोकनेता न्यूज नेटवर्क

'जगी सर्व सुखी असा कोण आहे।' श्री समर्थ रामदास स्वामींनी विचारलंय. पुढे म्हटलंय; 'विचारी मनां तूंच शोधूनी पाहे।' सुख म्हणजे ऐषोआराम शरीराला सुख देईल पण मनाला नाही. मनाचा आनंद भोगात नाही. तो त्यागात आहे. थोड्याशा सुखानेही आनंदी होणारा 'अल्पसंतुष्ट' नसून तो खरा आनंदीप्राणी आहे. मग आनंद देणाऱ्या गोष्टी कोणत्या, तर त्या आहेत अवती भवती निसर्गातच. त्यांत मनस्वी आनंद देणारी 'वैश्विक प्रतिके' आहेत. ती निसर्गातच आहेत. त्यांच्याकडे डोळसपणे पाहिले की, त्यांतला आनंद अनुभवता येतो. पण तो अनुभव अनुभूतीत परावर्तित झाला पाहिजे.

'आनंद' यात 'नंद' म्हणजे तृप्ती. म्हणजेच आ+नंद म्हणजे सर्व बाजूंनी तृप्ती. माझी अशी एक जीवन विषयक धारणा आहे. ब्राह्म मुहूर्तावर मंदिरातून येणारा सनई व घंटा यांचा नाद, काकड आरतीचे हलक्याशा वाद्यगजरासोबत येणारे नाद-शब्द-लय, जलाशयांवर उठणारे तरंग आणि पाठशाळांतून येणारे प्रार्थनेचे स्वर; या सर्व वैश्विक आणि मानव्य साधन सामुग्रीचा मी काया-वाचा-मने स्पर्श, गंध, नाद यातून मनमुराद आनंद घेते. मग काव्य स्फुरते. ते मनस्वी आनंद देते.

हाच आनंद मला अभिप्रेत असतो. त्यावेळी बाकी सर्वांची विस्मृती होते. सात्त्विक वृत्तीची झपाट्याने वाढ होते. जीवात्म्याला परमात्म स्वरूपाची जाणीव होते. सर्व चित्तवृत्ती मनांत एकवटून 'आनंदाचे डोही आनंद तरंग' अशी भावमग्न अवस्था येते. अशीच मी सायंशोभा, रात्री नीरव शांततेची व टळटळीत दुपारचीही अनुभूती घेते. प्रत्येक ऋतूतील हे वैविध्याने नटलेले कालचक्र आणि त्यांचे विभ्रम मी असोशीने अनुभवते. त्याच अनुभूतीतून मला काव्य स्फुरते. अवती भवतीची एखादी व्यक्ती निराश आहे, दु:खी आहे किंवा एखाद्या प्रसंगाने व्याकुळ किंवा नाराज आहे, तर त्या माझ्या निकटवर्तियांना दिलासा देणं, आपुलकीचे चार शब्द बोलून त्यांचे दु:ख हलकं करणं किंवा त्यांना भोवतालच्या परिसरातून आनंद घ्यायला उद्युक्त करणं यात मी धन्यता मानते. आपण इतरांच्या जीवनात आनंद आणू शकलो तर तीच आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता. लहान मुलांना त्यांच्या कलाने घेऊन हसतं ठेवणं ही माझी हातोटी आहे.

मला ज्या ज्या गोष्टीं पासून आनंद मिळतो त्या इतरांनाही दाखवायला मला आवडतात. वाचन हा माझा ध्यास आहे. सर्व प्रकारचे वाचन प्रकार मला वाचायला आवडतात. कविता करणं, लेख, कथा लिहिणं हा माझा छंद. त्यातून मला मनमुराद आनंद मिळतो. ज्यांनां स्वतःचं असं काही लिहायची इच्छा आहे पण ते करायला त्यांच मन उद्युक्त होत नाही त्यांना मी लिहायला प्रेरणा देते. लिखाणातून जो आनंद मी घेते तो दुसऱ्या होतकरूंना मिळावा, त्यांचे मनोबल वाढावे असे मला वाटते. आनंद वाटत जावा. निराशा, दु:ख यावरची ती एकमेव मात्रा आहे. गाणं आपल्याला गातां नाही आलं तरी ऐकून आनंद घेता येतो. गुणगुणतां येतं. अशा छोट्या छोट्या गोष्टीतून आनंद घ्यावा व द्यावा असे मला वाटते.एखाद्या आवडीच्या भावगीताचे स्वर 'आकाशवाणी'वरून कानावर पडतात मग मन आनंदाने डोलू लागतं व भाव समाधी लागते. ज्याची जी आवडीची कला असेल तिचा असा आस्वाद घेतला की होणारा आनंद जगातली कितीही संपत्ती प्राप्त झाली तरी त्याची बरोबरी करू शकणार नाही. इथे कोणत्याही प्रकारची उच्चनीचता आड येत नाही. आपला आनंद आपणच शोधायचा असतो.

# आता तरी जागे व्हा!

लोकनेता न्यूज नेटवर्क

अत्यंत संवेदनशील अशा विषयावरील कळीचा मुद्दाही आपल्याकडे एखाद्या दुर्घटनेनंतरच ऐरणीवर येतो. जैवविविधतेबाबत संपन्न असलेल्या पश्चिम घाटाचा आणि त्यामधील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांचा (ईएसए) मुद्दाही अशाच प्रकारे चर्चेत आला. त्याला निमित्त घडले ते केरळमधील वायनाड दुर्घटनेचे. मुसळधार पावसामुळे ३० जुलै रोजी वायनाड येथे झालेल्या भूस्खलनात तीनशेहून अधिक निरपराधांचा मृत्यू झाला. गुजरातपासून केरळपर्यंत पसरलेल्या पश्चिम घाटातील कथित विकास प्रकल्प विध्वंसक ठरत असून, ते निसर्गाच्या मुळावर येत असल्याचा मुद्दा आपल्याकडे मांडण्यास सुरुवात होऊनही साडेतीन दशके लोटली आहेत. पश्चिम घाट बचाव मोहिमेच्या माध्यमातून सातत्याने ही मांडणी केली गेली. त्यामुळे पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण होऊन प्रकल्पांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ लागले; परंतु प्रश्न विचारणाऱ्यांना विकासविरोधी ठरवून निसर्गाला ओरबाडणाऱ्या योजना तशाच पुढे रेटल्या गेल्या. यामुळे काय होऊ शकते आणि लोकसहभागाद्वारे पर्यायी विकासनीती कशी उभारली जाऊ शकते, हे डॉ. माधव गाडगीळ यांच्या समितीने आपल्या विस्तृत अहवालाद्वारे दाखवून दिले. मात्र, हा अहवाल आधी नाकारून, मग त्यावर आणखी एक समिती नेमून वेळकाढूपणा केला गेला. आजही तो तसाच सुरू आहे.

वायनाडसारखी दुर्घटना घडली, की पश्चिम घाट आणि गाडगीळ समितीचा अहवाल पुन्हा चर्चेत येतो, वरवरचे काही उपाय आखले जातात आणि चर्चा हवेत विरल्यानंतर पुन्हा मागच्या पानावरून पुढे सुरू होते. याच प्रक्रियेवर बोट ठेवून मुंबई उच्च न्यायालयाने धोरणकर्त्यांना प्रश्न विचारला आहे. 'वायनाड' नंतरही तुम्ही निद्रिस्त आहात काय, या प्रश्नावर केंद्रातील आणि राज्यातील सरकार जागे होते काय, हे पाहावे लागेल. वायनाडच्या दुर्घटनेनंतर 'ईएसए'ची चर्चा सुरू झाल्यानंतर केंद्र सरकारने पश्चिम घाटासाठी नव्याने अधिसूचना जारी केली असून, वन विभागाचे माजी महासंचालक डॉ. संजयकुमार यांच्या



नेतृत्वाखाली पाच तज्ज्ञांची समितीही नेमली. दीड लाख चौरस किलोमीटरहून अधिक क्षेत्रफळात पसरलेल्या पश्चिम घाटातील सुमारे ५७ हजार चौरस किलोमीटर क्षेत्राला पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील घोषित करून तिथे वाळू उत्खनन, खाणकाम यांसह अनेक प्रकल्पांवर बंदी घालण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. पश्चिम घाटाबाबतची ही पाचवी अधिसूचना. अधिसूचना आली, की काही तरी खुसपट काढून राज्यांनी विरोध करावा आणि मग ती रद्दबातल व्हावी, असा प्रकार सुरू आहे. आपल्याकडील राजकीय पक्षांच्या सामाजिक-राजकीय भूमिका भिन्न असल्या, तरी विकास आणि पर्यावरण यांबाबतच्या त्यांच्या संकल्पना फार वेगळ्या नाहीत. त्यामुळे केंद्र व राज्यांत कोणतेही सरकार असले, तरी पश्चिम घाटाबाबतचा त्यांचा दृष्टिकोन सारखा आहे. म्हणूनच तर अधिसूचनांवर अधिसूचना निघूनही प्रत्यक्ष काही होत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे प्रारूप अधिसूचनांना अंतिम स्वरूप येत नाही. अंमलबजावणीचा तर प्रश्नच उद्भवत नाही. राजकीय पक्षांत जागरूकता नसेल, तर ती आणता येऊ शकते. मात्र, जागरूक व्हायचेच नसेल, तर काय करावे हा प्रश्न आहे. झोपेचे सोंग घेतलेल्याला जागे करण्यासारखा हा प्रश्न आहे.मुंबई उच्च न्यायालयाचा प्रश्नही अशाच स्वरूपाचा. गाडगीळ समितीच्या अहवालानंतरच्या गेले दशकभर धोरणकर्त्यांनी असंवेदनशीलता दाखवून अक्षम्य दिरंगाई केली आहे. मोठा पाऊस आला, पूर आला किंवा दरडी कोसळल्या की निसर्गाला दोष द्यायचा किंवा वैश्विक तापमानवाढीवर खापर फोडायचे, हा प्रकार आता बंद व्हायला हवा. तापमानवाढ आणि त्याचे दुष्परिणाम हे वास्तव आहे, हे मान्य; परंतु ते रोखण्यासाठी आपण काय करणार; तसेच विध्वंसाला आमंत्रण देणाऱ्या विकासाची नीती कशी बदलणार हे ठरविण्याची गरज आहे. गुजरात, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ आणि तमिळनाडू या राज्यांचा कणा असलेल्या पश्चिम घाटाच्या पर्वतरांगा नैसर्गिक आणि जैविक वैविध्याचे आगार आहेत. तेथील निसर्गाला अनुकूल जीवनशैलीची स्थानिकांची, आदिवासांची परंपरा आहे. तिचा सन्मान करून, लोकसहभागाद्वारे पश्चिम घाटाला कसे वाचविता येईल, हे गाडगीळ अहवालाने सांगितले आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील, मध्यम संवेदनशील आणि कमी संवेदनशील असे वर्गीकरण करून उपाययोजना सुचविणारा हा अहवाल कृतीत आणण्याची गरज आहे. 'ईएसए'च्या अधिसूचनेला अंतिम स्वरूप देणे हे अंमलबजावणीसाठीचे पहिले पाऊल असू शकते. त्यासाठीची इच्छाशक्ती दाखविली गेली, तर वायनाडनंतर आपण जागे झालो, असे म्हणता येईल.

# विधान परिषदेचा ठसा!

लोकनेता न्यूज नेटवर्क

आपल्या देशातील संसदीय लोकशाहीच्या संदर्भात द्विसभागृह व्यवस्थेत महाराष्ट्र विधान परिषदेने उल्लेखनीय योगदान देत आपला वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटविला आहे. मॉंटेग्यू-चेम्सफर्ड शिफारशीनुसार भारत सरकार अधिनियम १९१९ अन्वये 'बॉंबे लेजिस्लिटिव कौन्सिल'ची प्रारंभिक बैठक १९ फेब्रुवारी, १९२१ रोजी मुंबईत 'टाऊन हॉल'मध्ये झाली. नारायण गणेश चंदावरकर यांची विधान परिषदेच्या सभापतीपदी झालेली नियुक्ती ही एक ऐतिहासिक घटना होती. सन १८६२ ते सन १९२० पर्यंत मुंबईच्या गव्हर्नरांच्या अध्यक्षतेखाली कौन्सिलचे काम चालत होते. सन १९२१ मध्ये चंदावरकर यांच्या रूपाने पहिल्यांदा भारतीय व्यक्तीची सभापती म्हणून नियुक्ती झाली. त्यामुळे सन १९२१ ते २०२१ हा महाराष्ट्र विधान परिषद शतकपूर्तीचा कालखंड मानता येईल.

भारताच्या घटनात्मक इतिहासातील १९१९-१९२०-२१ नंतरचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९३५ चा भारत सरकार कायदा (गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९३५) होय. या कायद्याद्वारे संघराज्यात्मक शासन पद्धतीचा स्वीकार करण्यात आला. या कायद्यान्वये विधानसभा आणि विधान परिषद असे नामाभिधान देऊन मुंबई प्रांतात १९३७ मध्ये दोन सभागृहे अस्तित्वात आली. विधान परिषदेचा आरंभबिंदू ठरवायचा झाला तर आपल्याला शंभर पेक्षाही जास्त वर्षे मागे जावे लागेल. २२ जानेवारी, १८६२ रोजी मुंबई येथील टाऊन हॉलच्या दरबार हॉलमध्ये भूतपूर्व मुंबई प्रांताच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलची (कौन्सिल ऑफ गव्हर्नर ऑफ बॉंबे) पहिली बैठक भरली होती. १८६२ ते १९३७ या ७५ वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीत जगन्नाथ शंकरशेठ, जमशेटजी जीजीभॉय, सर माधवराव विंचूरकर, रावसाहेब विश्वनाथ, नारायण मंडलिक, रावबहादूर गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, सर फिरोजशाह मेहता, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, गोपाळ कृष्ण गोखले, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, नारायण गणेश चंदावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर




अशी दिग्गज सन्माननीय सदस्यांची मालिका विधिमंडळाला लाभली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९२६ ते १९३७ या काळात या सभागृहाचे सदस्य होते.

महाराष्ट्र विधान परिषदेचा शतकमहोत्सव २०२३-२०२४ या कालावधीत साजरा करण्याचे ठरविण्यात आले. पहिला परिसंवाद आणि विद्यमान सदस्यांसह माजी सन्माननीय विधान परिषद सदस्यांचा स्नेहमेळावा आठ नोव्हेंबर, २०२३ रोजी मुंबईत विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात घेण्यात आला. त्यावेळी विधान परिषद सभागृहाची आवश्यकता आणि महत्त्व, आमच्या आठवणीतील विधान परिषद, या दोन विषयांवर हृद्य भावना व्यक्त झाल्या. त्यानंतर नागपूर हिवाळी अधिवेशन कालावधीत आठ डिसेंबर, २०२३ रोजी 'महाराष्ट्र विधिमंडळ संसदीय वाटचालीत हिवाळी अधिवेशनाचे महत्त्वपूर्ण योगदान' या विषयावर परिसंवाद झाला. याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. विधान परिषदेचे प्रदीर्घ काळ वार्तांकन केलेल्या ज्येष्ठ पत्रकारांनीही या दोन्ही परिसंवादांमध्ये सहभाग नोंदवला.विधान परिषदेच्या शतक महोत्सवाच्या निमित्ताने इतिवृत्तातील महत्त्वपूर्ण दस्तावेज, संसदीय लोकशाहीविषयी आस्था असणारे नागरिक, राज्यशास्त्र आणि समाजशास्त्राचे अभ्यासक आणि विद्यार्थी, पत्रकार स्नेही, विधिमंडळाचे दोन्ही सभागृहांचे विद्यमान आणि माजी सदस्य अशा सर्वांना त्या-त्या विषयांनुसार उपलब्ध व्हावेत, असे एक पीठासीन अधिकारी म्हणून मला वाटते.वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्त्व, विधान परिषदेने संमत केलेली महत्त्वपूर्ण विधेयके, ठराव आणि धोरणे, विधान परिषदेतील विविध विषयांवरील महत्त्वपूर्ण चर्चा, शंभर वर्षे, शंभर भाषणे... अशा प्रकारे चार विविधांगी विषयांवरील संदर्भसमृद्ध ग्रंथसंपदा यातून तयार होणार आहे. सध्या देशात महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगण, उत्तर प्रदेश आणि बिहार अशा सहा राज्यांमध्ये विधान परिषद हे द्वितीय सभागृह अस्तित्वात आहे. राज्यघटनेतील तरतुदीनुसार विधान परिषदेचे अस्तित्व हे विधानसभेच्या या संदर्भातील ठरावावर अवलंबून ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्राचा विचार करता हे द्वितीय सभागृह स्थापन झाल्यापासून म्हणजे सन १८६२ पासून ते आजपर्यंत या सभागृहाने भारतातील संसदीय लोकशाहीच्या वाटचालीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असते तेव्हा राज्यातील कोटी-कोटी जनता मोठ्या अपेक्षेने या लोकशाहीच्या मंदिराकडे बघत असते. सभागृहातील विचारमंथन व्यापक लोकहितासाठी स्वीकारावयाच्या निर्णय-निष्कर्ष-धोरण-कायदे यापर्यंत पोहचणारे असावे. ग्रंथ संकलन आणि संपादन प्रकल्पाच्या माध्यमातून हा वैभवशाली वारसा जुन्या पिढीकडून नव्या पिढीकडे सुपूर्द केला जात आहे.ही ग्रंथसंपदा वाचकांच्या हाती सोपविताना सन्माननीय सदस्यांचे विचारस्वातंत्र्य जपले जाईल, याची आम्ही काळजी घेतली आहे. भावनावेग अथवा जोरकसपणे आपले विचार मांडताना त्यावेळी वापरले गेलेले काही शब्दप्रयोग आता काहींना कदाचित अनुचित देखील वाटू शकतात. अधिकाधिक परिपूर्ण स्वरूपात हा ग्रंथनिर्मिती प्रकल्प सिद्ध करण्याचा आमचा प्रयत्न राहिला आहे. इतिवृत्ताचा भाग झालेली भाषणे बदल न करता घेण्यात आलेली आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मिती अगोदर सभागृहात मराठीबरोबरच काही सन्माननीय सदस्य गुजराती, इंग्रजी, हिंदी भाषेतून आपले विचार मांडत असत. ती भाषणे जशी आहेत तशी या ग्रंथांमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत.या ग्रंथमालिकेतील पहिल्याच ग्रंथाच्या सुरूवातीला विधान परिषदेच्या वैशिष्ट्यांबद्दल तसेच पूर्वेतिहासाबद्दल माहिती आहे. त्या शिवाय भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशात द्विसभागृह लोकशाही पद्धती लागू करण्यासाठी संविधान समितीच्या अनेक बैठकांमध्ये झालेल्या चर्चांचे इतिवृत्तही या ग्रंथात समाविष्ट करण्यात आले आहे. या शिवाय शंभर वर्षाच्या कालखंडात विधान परिषदेला प्रथमच लाभलेल्या महिला उपसभापती श्रीमती सिपाहीमलानी यांच्या व्यक्तिमत्व परिचयाचे प्रकरण या ग्रंथात आहे. शंभर वर्षाच्या या वाटचालीत नागपूर हिवाळी अधिवेशन कालावधीत राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा तर्फे आयोजित राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी सुवर्णमहात्सवी संसदीय अभ्यासवर्गाची वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आपल्याला लाभली आहे. या अभ्यासवर्गात महनीय नेते, लोकप्रतिनिधी, ज्येष्ठ पत्रकार यांनी मौलिक विचार मांडले आहेत. त्यांच्या विषयानुरुप व्याख्यानांचा समावेश या ग्रंथात करण्यात करण्यात आला आहे.

# प्रारब्ध आणि पुरुषार्थ

लोकनेता न्यूज नेटवर्क

मागील लेखात संचित, प्रारब्ध व क्रियमाण कर्माचा विचार केला. कोणतेही कर्म केले तर ते फळ देऊनच शांत होते. काही कर्मे लगेच फळ देतात तर काही कर्मांचे फळ उशिरा मिळते. हा कर्मफळ फलद्रूप होण्याचा काळ कमी जास्त असतो. एखादी व्यक्ती या जन्मात खूप सदाचारी असते पण संचितातील कर्मे प्रारब्धरूपाने येऊन ती त्या व्यक्तीला भोगावीच लागतात, असे मानले जाते. त्यामुळे आता चांगली कर्म करूनही त्याला दु:ख भोगावे लागते व दुराचारी सुखशय्येवर लोळतो. असे जर सर्व प्रारब्धानेच भोगायचे असेल तर कर्म तरी कशाला, असे वाटू शकते. हा विचार चूक आहे. प्रारब्ध भोगूनच संपवावे लागते. मात्र, आता चांगले वा वाईट कर्म करणे, हे माझ्या हातात आहे. या ठिकाणी पुरुषार्थाला म्हणजे क्रियमाणाला पुरेपूर संधी आहे. मागील गोष्टींचा विचार न करता आता चांगले कर्म करणे, हे आपल्या हातात आहे. प्रारब्ध व पुरुषार्थ एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ते परस्परपूरक आहेत. पैसे मिळणे प्रारब्धाधीन आहे. माझ्या प्रारब्धात जेवढे पैसे असतील तर तेवढेच मिळतील.एखादी अनेक व्यवसाय करते, पण यश येत नाही. त्यामुळे अर्थार्जन प्रारब्धात आहे पण त्याचा विनियोग करणे त्याच्या हातात आहे. नोकरी मिळणे प्रारब्धात असते पण कर्तृत्वाने नोकरीत बढती मिळवण्यात पुरुषार्थ आहे. पती किंवा पत्नी मिळणे प्रारब्धात आहे. संसार मात्र नेटका, चांगला करणे यात पुरुषार्थ आहे. यासाठी चतुर्विध पुरुषार्थ आहेत. १) धर्म २) अर्थ ३) काम ४) मोक्ष. यात काम व अर्थ यांना धर्म व मोक्षाने बांधले आहे. पैसा हा धर्माने मिळवावा व मोक्षासाठी काम या पुरुषार्थाचा वापर व्हावा. हे जर चतुर्विध पुरुषार्थाचा सम्यक वापर असेल तर जीवन सुखी होईल व कर्म करताना आनंद होईल. विपरीत स्थितीतही चांगले कर्मच होईल. एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे की कर्म करण्यात आपण स्वतंत्र आहोत पण फळ भोगण्यास परतंत्र आहोत. भगवान हेच सांगतात, 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।' कर्म करणे आपल्या हातात आहे, पण माझ्या कर्माचे असेच फळ हवे, ही अपेक्षा गैर आहे. एकदा कर्म घडले की त्याचे फळ हे मिळणारच. पुण्य व पापकर्मांची बेरीज होते व सर्वच भोगावी लागतात. मग या चक्रातून मुक्तताच होणार नाही का? तोही विचार करूया..

## बाभळी बंधारा पाणलोट क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या बुडित जमीनी

# ३६५ हेक्टरचा मावेजा १८८.२० कोटी वाटप करा-शंकरराव जाधव रोशनगावकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

नांदेड जिल्हयातील धर्माबाद तालुका हा तेलंगणा सिमेवर असुन गोदावरी नदीकाठावर आहे. लगतच्या तेलंगणा भागात गोदावरी नदीवर ११२ टी.एम.सी. पाणी साठवण असलेले पोचमपाड धरण आहे. या धरणाचे बॅक वॉटरचे पाणी महाराष्ट्रात ७ कि.मी. क्षेत्रात थांबते. ज्यामुळे महापूर परिस्थिती, तेलंगणा शासन-प्रशासनाच्या खोडसाळपणामुळे पोचमपाड धरणाचे दरवाजे संपर्क करुनही न उघडल्यामुळे व मांजरा नदीच्या पुराचे पाणी थांबल्यामुळे वरच्या भागात (महाराष्ट्रात) रेटल्या जाऊन, गोदावरीचे दोन्ही काठ ओलांडुन शेतीत पसरते व हजारो हेक्टर जमीनीत ३-४ दिवस थांबते. ज्यामुळे दरवर्षी धर्माबाद, बिलोली, नायगाव व उमरी तालुक्यातील गोदाकाठची खरीप पिके, गुरांचा चारा ४-४ दिवस थांबलेल्या पुराच्या पाण्यात बुडुन नष्ट होतो.

शेतक-यांचा खरीप हंगाम अक्षरशःपाण्यात जातो. त्याने केलेले कष्ट व खर्च वाया जाऊन तो कफल्लक होतो. शिवाय बाभळी उ.पा.बंधा-याच्या पाणलोट क्षेत्रातील ३६५ हेक्टर जमीनी बुडित असतात. ह्या बुडित जमीनीधारक शेतक-यांना मोबदला देणेसाठी चतुर्थ सुधारीत प्रशासकिय मान्यतेनुसार दिनांक ०१.०८.२०२३ नुसार १८८ कोटी रुपये नुकसान भरपाईची आर्थिक तरतुद करण्यात आली असुन, तसा शासन आदेश ही दिनांक २७.१०.२०२३ रोजी निर्गमित झाला आहे.

बाभळी उ.पा.बंधारा कृति समिती कार्यालयीन सचिव म्हणुन शासन, प्रशासनाकडे सविनय पाठपुरावा चालु



आहे. जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुख्यमंत्री यांनी तातडीने नोंद घेऊन संबंधित विभागातील अधिका-यांना कार्यपूर्तीसाठी आदेशित करुन माहितीस्तव एक प्रत कृति समितीला दिला जातो, पण सद्य परिस्थितीत अमृत महोत्सवी वर्ष संपून एक वर्षाच्या कालावधी लोटुन प्रशासन ढम्म आहे, एकही पैश्याचे काम झाले नाही.विशेष म्हणजे संकीर्ण कामांसाठी तरतुद असुन, मुख्य सडकेपासुन बंधा-याकडे जाणा-या सडकेची दुरावस्था झाली असुन सडकेवर बाभळीची झुडपे व मोठमोठे खड्डे पडुन येजा करणे कठीन झाले आहे. बंधा-याची सुरक्षितता धोक्यात आली आहे. सुरक्षा कर्मचा-यांची नेमणुक व विजेचे दिवे बंद असल्यामुळे अवघड बाब बनली आहे. अधिकारी केवळ १ जुलै दारे उघडणेसाठी, २९ ऑक्टोंबर रोजी दारे बंद करणे व १ मार्च रोजी न्यायालय आदेशन्वये ०.१० टीएमसी पाणी दरवाजे उघडुन तेलंगणात सोडण्यासाठी तोंड दाखवितात. तर सिंचन क्षेत्र वाढविण्याची गरज काय? सिमेलगत तेलंगणातील १२ महिने हिरवागार परिसर व समृध्द शेतकरी बघुन राज्य सिमा लगतच्या भागातुन जनता तेलंगणात जाण्याची मागणी करतात, त्यांचे काय चुकले? तरी किमान १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत तरी ४१ गावातील बुडित जमीनीचा मावेजा १८८.२० कोटी वाटप करुन पूरपिडीतांना व अतिवृष्टीग्रस्तांना न्याय द्या अशी मागणी शंकरराव जाधव, रोशनगावकर यांनी बुडित शेतक-यांतर्फे केली आहे.



पाटोदा पोलीस ठाण्याचे नवीन पोलीस निरीक्षक म्हणून मजहर अली सय्यद हे रुजु झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना. पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमिनाथजी कोल्हे, युवा उद्योजक विशाल आरसुळ, पत्रकार पोपट कोल्हे, बब्बु शेख, पत्रकार अजिज शेख, जाकेर पठाण, पत्रकार चंद्रकांत पवार व नाभिक संघटनेचे तालुकाध्यक्ष जितेंद्र सांगळे.

## अशोक प्राथमिक शाळेत 'स्वयंशासन दिन' उत्साहात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**



५ सप्टेंबर रोजी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस संपूर्ण भारतभर शिक्षक दिन म्हणून साजरा करतात. अशोक प्राथमिक शाळा , विष्णूनगर नांदेड येथील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात स्वयंशासन दिन साजरा केला. शिक्षकांची जबाबदारी या चिमुकल्या मुलांनी लिलया सांभाळली. वर्गात शिकवण्याबरोबरच स्वाध्याय व तोंडी प्रश्न उत्तर यांची तयारी मुलांनी करून घेतली. शिक्षक होणे जितके सोपे वाटते, तितकीच शिक्षकाची जबाबदारी निभावणे अवघड असते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.पेठे मॅडम तसेच प्रमुख पाहुणे म्हणून शाळेच्या संचालिका सौ. ज्योती बालाजीराव पांडागळे या होत्या. मुलांची शिकवण्याची पद्धती, शिक्षकांची जबाबदारी पाहून कौतुकाची थाप त्यांनी विद्यार्थ्यांच्या पाठीवर दिली. आजच्या स्वयंशासन दिनानिमित्त इयत्ता चौथीच्या अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी शिक्षक म्हणून आपला सहभाग नोंदवला होता. तसेच प्रेरणा गायकवाड या विद्यार्थिनीने मुख्याध्यापकाची भूमिका उत्कृष्टपणे बजावली. शाळेचे संचालक श्री. व्यंकटराव चांडोळकर , श्री. बालाजी माधवराव पांडागळे ,श्री गोविंद नांदेडे , श्री.सुधाकर देव तसेच माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. वनंजे सर यांनी मुलांचे खूप कौतुक केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## चैतन्य विद्यालयात स्वयंशासन दिन संपन्न:विद्यार्थी बनले शिक्षक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ओतूर । मयूर ढोबळे**

येथील ग्राम विकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयात आज ५ सप्टेंबर शिक्षक दिनाच्या निमित्ताने स्वयंशासन दिनाचे आयोजन केले गेल्याची माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.प्रथमता: आपल्या देशाचे दुसरे राष्ट्रपती व महान शिक्षण तज्ञ डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन तसेच महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमांचे पूजन केले गेले. त्यानंतर जे विद्यार्थी आज स्वयंशासन दिनाच्या निमित्ताने एक दिवशीय शिक्षक झाले होते त्यांनी अध्यापन करण्यास सुरुवात केली. या एकदिवसीय कामकाजासाठीचे मुख्याध्यापक म्हणून शिवानी तांबे,उपमुख्याध्यापक म्हणून अरकान तांबोळी, पर्यवेक्षक म्हणून आकाश मस्करे ,अवधूत अकोलकर यांनी काम पाहिले. या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी भाऊसाहेब खाडे आणि अजित डांगे यांनी विशेष परिश्रम घेतले. पहिले एक ते सहा तास झाल्यानंतर



विद्यार्थ्यांची सभा संपन्न झाली. अध्यापन करताना कोणते अनुभव आले याबाबत श्रावणी वारुळे, रूजल फापाळे, वेदांत ढमाले, आर्या हांडे यांनी मनोगते व्यक्त केली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरकान तांबोळी याने तर आर्या हांडे हिने आभार मानले. अनुष्का मोरे, तनिष्का खेत्री यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे सचिव प्रदीप गाढवे, पंकज घोलप, संजय हिरे, अनिल उकिरडे

शरद माळवे, विजया गडगे, मंगेश तांबे,राजाराम शिंदे, प्रमोद जाधव, बाळासाहेब साबळे, संतोष सोनवणे,विशाल चौधरी, मिलिंद खेत्री, संतोष कांबळे, लक्ष्मण दुडे, वनिता भोर,आसावरी गायकर,आशा गाडेकर, सोनाली कांबळे, देवचंद नेहे, अमित झरेकर,सोनाली माळवे, दिनेश ताठे, अनिल जवरे,आशा डुंबरे, अश्विनी नलावडे, सौरभ ढमाले, हर्षल शितोळे, योगेश फापाळे,ईश्वर ढमाले, साक्षी देशमुख, निर्मला डोंगरे, आराधना इसकांडे, सुजाता राऊत,विजय खरात, प्रसन्न तांबे, मयूर जाधव, अरविंद अश्रमरे आदि उपस्थित होते.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात प्लास्टिक बंदीचा निर्णय

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार, प्लास्टिक बंदी बद्दल राजपत्र अधिसूचना तसेच महाराष्ट्र सरकार, उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि युनिसेफ इंडिया यांनी संयुक्तपणे महाराष्ट्रातील प्रत्येक महाविद्यालय प्लास्टिक मुक्त परिसर करण्याचा निर्णय घेतला. आपल्या निसर्गाचे रक्षण करण्यासाठी आमचे कॉलेज व्यवस्थापन, युथ नेचर क्लब (ग्रीन क्लब) आणि राष्ट्रीय स्वयंसेवा, कॉलेज कॅम्पसमध्ये प्लास्टिक किंवा पॉलिथिन पिशव्या, प्लास्टिकच्या पाण्याच्या बाटल्या, चॉकलेट रॅपर, फूड रॅपर इत्यादींचा वापर करण्यास मनाई करण्याचा निर्णय घेतला.




प्राचार्य डॉ. एस.जी. सुर्यवंशी यांनी २८ ऑगस्ट २०२४ रोजी प्लास्टिक मुक्त कॅम्पस उपक्रम राबविण्याची परवानगी दिली. या उपक्रमात कॉलेज कॅम्पसच्या विविध भागांतून पॉलिथिन पिशव्या, प्लास्टिकच्या पाण्याच्या बाटल्या, चॉकलेट रॅपर, फूड रॅपर इत्यादी गोळा करण्यात आले. , वर्गखोल्या, कार्यालय, वसतिगृहे, कॅन्टीन इ. एकूण ६० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला आणि ०५ शिक्षक कर्मचारीही या उपक्रमात उपस्थित होते. कॉलेज कॅम्पसमधून एकूण ७० किलो प्लास्टिक कचरा गोळा करण्यात आला आणि तो श्रीगोंदा प्लास्टिक कचरा दुकानात पुनर्वापरासाठी देण्यात आला. या उपक्रमादरम्यान डॉ. अहिरे वाय.आर. (जीसीएफसी) यांनी कॉलेज कॅम्पसमधील विद्यार्थ्यांना प्लास्टिक बंदीचा संदेश दिला. खान अफरोज (अध्यक्ष) यांनी प्लॅस्टिकचा पर्यावरणावर होणारा परिणाम आणि श्री खंडगले ओंकार यांनी एकेरी वापराच्या प्लॅस्टिकवर बंदी असायला हवी असे सांगितले. सर्व संयोजन श्री हरल किरण (उपाध्यक्ष), समन्वयक यांनी केले आणि सदस्यांमध्ये कामाचे वाटप करण्यात आले, या उपक्रमामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये प्लास्टिकचा वापर टाळण्यासाठी पूर्णपणे बदल होईल. या कार्यक्रमासाठी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस.जी.सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले तसेच प्रा. आर. एम. रसाळ , डॉ. एम.डी. सुर्यवंशी, प्रा. बेडसे मिलिंद, डॉ. मन्मथ लोहगावकर यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

## आदर्श विद्यालयात तालुकास्तरीय ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

समग्र शिक्षा अभियान अंतर्गत पंचायत समिती सिंदखेड राजा च्या वतीने दिनांक ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिना निमित्त आदर्श विद्यालय सिंदखेड राजा येथे तालुका स्तरीय ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष जिजामाता वाचनालयाचे अध्यक्ष श्री. अशोकजी मिनासे होते, प्रमुख अतिथी शाळेचे मुख्याध्यापक श्री सुभाष मोरे सर, श्री. पद्माकर गवई सर तालुका समन्वयक ,पंचायत समिती, श्री.विकासजी भुसारे सचिव जिजामाता वाचनालय, सौ.सुमित्रा विकास भुसारे ग्रंथपाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

सुरवातीस राजमाता जिजाऊ, सावित्री बाई फुले व डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर श्री. गवई सर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे श्री. मोरे सर यांनी महवाचान अभियानात सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन केले. तसेच विकासजी भुसारे सर यांनी पुस्तक व ग्रंथालयाचे याचे जीवनातील महत्व पटवून दिले.शेवटी अध्यक्षीय भाषणात श्री. अशोकजी मिनासे यांनी वाचन संस्काराचे महत्व पटवून जिजामाता वाचनालय सर्वांसाठी खुले आहे सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा , असे आवाहन याप्रसंगी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.एस.एम.भुतेकर सर यांनी केले तर आभार माने मॅडमने केले. त्यानंतर प्रमुख मान्यवरांच्या हस्ते तालुका स्तरीय ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यासाठी ग्रंथ दालन खुले करण्यात आले.सदर ग्रंथ प्रदर्शनाच्या आयोजना साठी आदर्श विद्यालय सिंदखेड राजा तसेच जिजामाता सार्वजनिक वाचनालय यांचे विशेष सहकार्य लाभले.

## सांगोला रोटरी क्लब तर्फे शिक्षक दिन साजरा




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

दिनांक ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो.या दिनाचे औचित्य साधून क्लब तर्फे शिक्षक सदस्यांचा सत्कार करण्यात आला.सांगोला रोटरी क्लबने शिक्षकांचा सन्मान करुन सामजिक भान जपले आहे.या सत्कार समारंभात.प्राथमिक विभागातील सेवानिवृत्त शिक्षक अरविंद डोंबे,माध्यमिक विभागातून न्यू इंग्लिश स्कूल सांगोला चे उपमुख्यध्याप्क प्रा.संजय शिंगाडे,ज्यु.कॉलेज विभागातून सेवानिवृत्त झालेले प्रा.राजेंद्र ठोंबरे व सांगोला महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ.भगवंत कुलकर्णी याना सन्मानित करण्यात आले.सर्व विभागातील शिक्षकांचा सन्मान करुन रोटरी क्लबने समतोल साधला असल्याचे मत.प्रा.राजेंद्र ठोंबरे यानी व्यक्त केले.शिक्षक हाच शिल्पकार असल्याचे सांगुन डॉ.कुलकर्णी यानी रोटरी उपक्रमास शुभेच्छा दिल्या.अध्यक्ष रो.इंजि.विकास देशपांडे यानी प्रास्ताविक व सचिव रो.इंजि.विलास बिले यांनी आभार प्रदर्शन केले .या वेळी रो.डॉ.कोळेकर,रो.इंजि अशोक गोडसे उपस्थित होते.

# राजकुंवर महाविद्यालय येथे अंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री मुला-मुलींची स्पर्धाचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

जालना । ज्ञानेश्वर बुधवत

आज दि ६ रोजी राजकुंवर महाविद्यालय वाघरुळ (जहागीर) ता. जिल्हा. जालना येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर व राजकुंवर महाविद्यालय, वाघरुळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जालना झोन अंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धा '२०२४ -२५ येथे पार पडली .स्पर्धेचे उद्धाटन हे उद्धाटक म्हणून लाभलेले राजकुंवर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माननीय प्रा. डॉ. भगवान सिंग डोभाळ , महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. फुलचंद सलामपुरे यांच्या हस्ते करण्यात आले. सदरील उद्धाटनास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. सम्राटसिंग राजपूत (पोलीस निरीक्षक चंदन झिरा, जालना) प्रा. डॉ. गणेश अग्निहोत्री ( प्राचार्य जे.इ.एस. महाविद्यालय जालना) हे उपस्थित होते. तसेच प्रमुख उपस्थिती प्रा. डॉ. हेमंत वर्मा (जालना जिल्हा क्रीडा समन्वयक ),प्रा. डॉ. बाबासाहेब म्हस्के (शारीरिक शिक्षण अभ्यास मंडळ सदस्य) प्रा.भिकुलाल सले (क्रीडा विभाग प्रमुख बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय जालना) प्रा. डॉ. विशंभर तनपुरे (मोरेश्वर महाविद्यालय भोकरदन) डॉ.श्याम काबलीवाले (भारत बीपीएड महाविद्यालय जालना) श्री. बबनराव खरात (जिल्हा परिषद सदस्य वाघरूळ) डॉ.लक्ष्मण जाधव सर, डॉ. आर. पी .राठोड (गोदावरी महाविद्यालय अंबड )डॉ. नेताजी मुळे (स्वामी विवेकानंद महाविद्यालय मंठा )डॉ.अमृत बिराडे (निवृत्त प्राध्यापक मिलिंद महाविद्यालय ),सौ . सुषमाताई गजानन खरात( पंचायत समिती सदस्य वाघरूळ )श्री .विलास खरात (सरपंच वाघरूळ)श्री.प्रा. तुळशीराम शेवाळे (श्री .रंगनाथ महाराज हायस्कूल वाघरुळ) इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती .स्पर्धा सकाळी ६.३० वाजता राजकुंवर महाविद्यालय येथून सुरू झाली .क्रॉस कंट्री धावण्याची अंतर १० कि.मीटर होते. स्पर्धेमध्ये एकूण ३५ स्पर्धक सहभागी झाले होते ,या स्पर्धकांमधून प्रथम क्रमांक अंकित कांबळे (सिद्धार्थ महाविद्यालय जाफराबाद) यांनी पटकावला त्यांना गोड मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. द्वितीय क्रमांक वेंकटेश विष्णू खरात( राजकुवर महाविद्यालय वाघरुळ) यांनी पटकावला त्यांना सिल्वर मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तर तृतीय क्रमांक आनंद दांडगे (सिद्धार्थ महाविद्यालय जाफराबाद) यांना पटकावला त्यास ब्रास मेडल व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे नियोजन पार पाडण्यास व विशेष परिश्रम घेणारे प्रभारी प्राचार्य राजेंद्र जायभाये ,प्रा. अनिल शिंदे ( राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी) प्रा. विजय कुमार देशमुख (क्रीडा प्रशिक्षक )प्रा. प्रवीण गाडेकर ( सहाय्यक क्रीडा प्रशिक्षक )प्रा.चंद्रमुनी जोगदंड ,प्रा.शेख शारेक, श्रीमती डॉ.सरला डोईफोडे, प्रा. ज्ञानेश्वर कदम ( प्रभारी प्राचार्य राजकुंवर महाविद्यालय राळा) प्रा. किशोर वाहुळ ,श्री .भगवान जोगदंड ,श्री .संतोष जाधव, श्री .सुनील शिंदे ,श्री. गजानन जोगदंड व इतर प्राधपकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भरत लेंडीकर यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. बाबासाहेब जाधव यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता ही राष्ट्रगीताने करण्यात आली.



# तालुकास्तरीय कुस्ती व तायक्कांदो स्पर्धेत विद्याधाम प्रशालेचे यश



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

रांजणगाव गणपती । प्रतिनिधी

तालुका स्तरीय कुस्ती स्पर्धा आंबळे ता.शिरूर या ठिकाणी पार पडल्या.या स्पर्धेत विद्याधाम प्रशालेचे दोन खेळाडू जिल्हास्तरावर निवड झाली.चौदा वर्ष वयोगटामध्ये फ्री स्टाईल कुस्ती प्रकारात निल महेंद्र सोनार आणि एकोणीस वर्षे वयोगटात ग्रीको रोमन कुस्ती प्रकारात संस्कार निलेश येलभर या दोन खेळाडूंनी तालुका स्तरावर यश मिळवून दोघांची जिल्हास्तरावर निवड झाली. त्याचप्रमाणे तायक्कांदो स्पर्धेत चौदा वर्षे वयोगटात सोहम पोटे गोल्ड मेडल,आयुषी जीवाडे ब्रॉझ मेडल,पुजा पांढरे सिल्व्हर मेडल मिळाले तसेच सतरा वर्षे वयोगटात धनश्री मचाले गोल्ड मेडल मिळाले. या खेळाडूंना क्रिडा विभाग प्रमुख सचिन रासकर, क्रिडा स्पर्धा प्रमुख भास्कर करंजुले,संदीप तानवडे व शरद दरवडे यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी खेळाडूंचे व मार्गदर्शक शिक्षकांचे प्रशालेचे प्राचार्य गुरूदत्त पाचर्णे, पर्यवेक्षक दिगंबर नाईक, मच्छिंद्र बनकर, चंद्रकांत देविकर तसेच संस्थेचे अध्यक्ष अनिल बोरा, सचिव नंदकुमार निकम, शालेय समितीचे अध्यक्ष धरमचंदची फुलफगर यांनी अभिनंदन केले.

### हिंगोली शहरासाठी महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत

# शहरासाठी वाढीव पाणीपुरवठा प्रकल्पास मान्यता महायुतीचे मनस्वी आभार-रामदास पाटील सुमठाणकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव । महादेव हरण

हिंगोली नगरपालिका हद्दीतील वाढीव भागासाठी पाणी पुरवठाच्ची आवश्यकता लक्षात घेऊन नगरपालिका प्रशासनने ८४. ५० कोटींचा वाढीव पाणीपुरवठा प्रस्ताव तयार केला होता.मागील ४ महिन्यापासून सतत संचालक नगरपालिका प्रशासन,मुंबई आणि नगरविकास विभाग, मुंबई यांच्याकडे सतत आमच्याकडून प्रयत्न केले जातं होते. त्यासाठी मला हि अनेक वेळा मुंबई च्या चकरा माराव्या लागल्या वेळोवेळी तृटी पूर्तता कराव्या लागल्या.तसेच पाठपुरावा करावा लागला.त्याला मूर्त रूप आज सायंकाळी शासनाने मान्यता देऊन पूर्ण केले. यातून राज्याचे मुख्यमंत्री मा एकनाथभाई शिंदे, लोकनेते मा देवेंद्रजी फडणवीस साहेब,मा उपमुख्यमंत्री मा अजितदादा पवार यांनी हिंगोली करासाठी भरभरून दिले आहे त्याबद्दल मनस्वी आभार.

या योजनेते आदर्श नगर, श्रीकृष्ण नगर आणि तिरुपती नगर भागात स्वतंत्र पाण्याच्या टाक्या होणार आहेत. तसेच तर साधारणतः ७७ किमी पाइपलाइन होणार आहे.तसेच वर्तमान पणीपुरपूर्वठा योजनेचं नूतनिकरण होणार आहे. त्याच बरोबर वारंवार लाइट चा त्रास होऊ नये म्हणुन स्वतंत्र एक्स्प्रेस फिडर ची निर्मिती केली जाणार आहे तसेच हि सर्व योजना सोलार सिस्टीम वर आधारित उभारली जाणार आहे.आतून भविष्यात उर्जबचत होणार असून नगरपालिका ला फायदा होणार आहे याचं बरोबर अनेक वैशिष्टपूर्ण कामे या



योजनेत घेतली गेलेली आहेत. या कामी मागील अनेक महिन्यापासून मा आ.तानाजीराव मुटकुळे , मा.नगराध्यक्ष बाबारावजी बांगर, मा.दिलीपराव चव्हाण व सर्व नगरसेवक आणि विशेषतः नगरपरिषद मुख्याधिकारी तथा प्रशासक श्री अरविंद जी मुंडे आणि त्यांचे तांत्रिक कर्मचारी यांचे मोलाचे योगदान आहे.


त्याच बरोबर आगामी काळात लवकरच शहरातील रस्त्याचा टप्पा-३ हा ७० कोटीचा रस्ता प्रकल्प अंतिम टप्यात असून त्याला हि संचालक नगरपालिका प्रशासन यांनी मान्यता आणि शिफारस दिलेली असून हा प्रकल्प शासनाकडे मान्यतेसाठी प्रलंबित आहे. आगामी काही दिवसात मंजुरी होईल असे रामदास पाटील सुमठाणकर यांनी सांगितले. हिंगोली शहरच्या सर्वांगिन विकासासाठी सदैव प्रयत्नशील असल्याचे हि त्यानि सांगितले आणि शासनाचे आणि नगरपालिकाचे आभार मानले.

# प्रबळ इच्छा शक्ती असल्यास कोणतीही गोष्ट अशक्य नाही-पी.एस.आय संदीप कदम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले

कोळगाव..भारत देश पुरुषप्रधान असला तरी कायदे स्त्रीप्रधान आहे. जगात ज्ञान असलेल्या व्यक्तीलाच किंमत आहे. अज्ञानी व्यक्तीचे जगात शोषण केले जाते.विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात चुकीचा मार्ग न पकडता डोळयासमोर ध्येय ठेवावे. शांत ,संयमी,प्रबळ इच्छाशक्ती असल्यास कोणतीही गोष्ट अशक्य नाही. जीवनातील ध्येय गाठण्यासाठी सोशल मीडियापासून दूर रहा. असे प्रतिपादन पी.एस.आय संदीप कदम यांनी श्री कोळाईदेवी विद्यालयात आयोजित 'सायबर सिक्युरिटी व विद्यार्थ्या संदर्भातील कायदे' या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले. पी एस आय कदम हे




शिवाजी नगर पुणे येथे कार्यरत आहेत शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यालयाचे मुख्याध्यापक शहाजी हिरडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवीणकुमार लोंढे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.

सायबर सिक्युरिटी विषयी बोलताना श्री कदम म्हणाले की विद्यार्थ्यांनी सोशल मीडियापासून दूर राहिले पाहिजे. सोशल मीडियाचे अकाउंट असेलच तर ते टू स्टेप व्हेरिफिकेशन असणे गरजेचे आहे. यामुळे आपले व्हाट्सअप सुरक्षित राहते. इतरांचे वायफाय वापरू नये. आपल्या मोबाईलवर आलेली ए.पी.के फाईल कधीच ओपन करू नये. ही फाईल जर ओपन केली तर आपली सर्व गोपनीय माहिती हॅक होते. प्ले स्टोअर वरून कोणतेही प डाऊनलोड करण्यासाठी पची परवानगी देताना काळजी घ्यावी. शक्यतो आपला मोबाईल दुसऱ्याला देऊ नये. व्हाट्सअप चे कॉल शेअर करू नये. जेवढे आपणास शक्य होईल तेवढा सोशल मीडियाचा कमीत कमी वापर करावा. सायबर सिक्युरिटी बरोबरच संदीप कदम यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना जीवनात योग्य ध्येय ठेवण्याचे आवाहन केले. चूकीचे काम, दादागिरी ,रॅगिंग यापासून विद्यार्थ्यांनी दूर राहावे असा मोलाचा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. मुलींनी आपल्या समस्या शिक्षकांना वेळीच जर सांगितल्या तर वाईट घटनांना आळा बसेल असे मत कदम यांनी व्यक्त केले. उपस्थित विद्यार्थ्यांनी संदीप कदम यांना विविध प्रश्न विचारले. सर्व प्रश्नांची त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली.विद्यालयाचे मुख्याध्यापक शहाजी हिरडे, डी .टी गायकवाड, संजय ठोकळ, सुवर्णा देशमुख यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते. मंजुश्री धिवर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर संजय ठोकळ यांनी आभार प्रदर्शन केले.

### श्रीक्षेत्र अरणला तिर्थक्षेत्राचा 'अ' वर्ग प्राप्त

# महायुती सरकारचे आभार-अभिमन्यु उबाळे (मामा) एकता परिषद महाराष्ट्र राज्य

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

जालना । प्रतिनिधी

संत शिरोमणी सावता महाराज यांच्या जन्मभुमी अरण या तिर्थश्रेत्राला आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अ वर्ग दर्जा देण्यासाठी मंजूरी मिळाली. तमाम माळी समाजाच्या दृष्टीने अभिमानास्पद व आनंददायी बाब आहे.दिनांक ५ सप्टेंबर रोजी महायुती सरकारच्या वतीने संतशिरोमनी सावता महाराज यांची जन्मभूमी व कर्मभूमी असलेल्या श्रीक्षेत्र अरणला तिर्थक्षेत्राचा अ देण्याचा निर्णय घेण्यात आला. याबद्दल महायुती सरकारचे मुख्यमंत्री ना.श्री.एकनाथजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब व ना.श्री.अजितदादा पवार साहेब व



राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री. मा. छगनराव भुजबळ साहेब. ओबीसी कल्याण व गृहनिर्माण मंत्री मा.अतुलजी सावे साहेब. यांच्या विशेष प्रयत्नाने व उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे विशेष सहकार्य लाभले.यांचे तसेच सर्व मंत्रिमंडळाचे एकता परिषदेच्या वतीने जाहीर आभार.काल झालेल्या सरकारच्या या निर्णयाचा सर्वाधिक आनंद एकता परिषदेला आहे.एका अर्थी नुसता अरण प्रश्न शासन दरबारी नाही तर शासनच अरणच्या दरबारात आणले.त्यामुळे महायुती सरकार व मा ना . अतुलजी सावे साहेबांचे खुप खुप धन्यवाद आणि माळी समाज व सावता भक्ताचे आभार.अभिमन्यु उबाळे (मामा)एकता परिषद महाराष्ट्र राज्य.

# माजी मंत्री सुरेश धस यांच्या प्रयत्नाने आष्टी मतदारसंघातील ४ देवस्थानांच्या विकास कामासाठी १६ कोटी रु.मंजूर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

माजी राज्यमंत्री सुरेश धस यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे आष्टी विधानसभा मतदारसंघातील..आष्टी तालुक्यातील श्रीक्षेत्र रेणुकामाता देवस्थान बेलगाव,श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव आणि पाटोदा तालुक्यातील श्री क्षेत्र संत मीराबाई गुरु भगवान संस्थान महासांगवी आणि श्रीक्षेत्र आ अश्वलिंग महादेव मंदिर पिंपळवंडी या देवस्थानांच्या विकासासाठी ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास विभागाच्या वतीने १६ कोटी रुपयांचा भरघोस निधी मंजूर करण्यात आला आहे.. याविषयीची अधिक माहिती अशी की,

महाराष्ट्र राज्यातील.. ब वर्ग दर्जा असलेल्या देवस्थानाच्या ठिकाणी दरवर्षी भाविक भक्त दर्शनासाठी मोठ्या संख्येने हजेरी लावत असतात.. अशा देवस्थानांचा विकास करणे बाबत.. ग्रामीण विकास विभाग शासन निर्णय दि.६ सप्टेंबर २० २४ नुसार ..आष्टी तालुक्यातील..श्री क्षेत्र रेणुका माता देवस्थान बेलगाव येथे वाहन तळ १०० लक्ष रु.,

मंदिर परिसर सुशोभीकरण १० लक्ष रु.भक्तनिवास १० लक्ष रु.,संरक्षण भिंत १५४ लक्ष रु.,पुरुष भक्त निवास ८५ लक्ष रु.पोहोच रस्ता आणि सीडी वर्क १२० लक्ष रु.आणि पेव्हिंख ब्लॉक १० लक्ष रु.असे



एकूण ४ कोटी ९० लक्ष रु.श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव या ठिकाणी प्रसादालय बांधकाम २०० लक्ष रु.वाहनतळ बांधकाम पेव्हर ब्लॉक व कॉंक्रिटीकरण करणे २०० लक्ष रु. असे एकूण ४.०० कोटी रु. पाटोदा तालुक्यातील.. श्री क्षेत्र संत मीराबाई गुरु भगवान संस्थान महासांगवी या ठिकाणी वाहन तळ बांधकाम ४२ लक्ष रु.पुरुष भक्त निवास बांधकाम १०० लक्ष रु. महिला भक्तनिवास बांधकाम ७७.२० लक्ष रु.पोहोच रस्ता २० लक्ष रु. पोलसह एलईडी लाईट १० लक्ष रु.स्ट्रीट लाईट १० लक्ष रु.,संरक्षण भिंत २० लक्ष रु.आणि सुशोभीकरण २० लक्ष रु.असे एकूण ३ कोटी रु. तसेच श्रीक्षेत्र अश्वलिंग महादेव मंदिर पिंपळवंडी या ठिकाणी प्रसादालय बांधकाम ८२ लक्ष रु.भक्तनिवास ५० लक्ष रु. संरक्षण भिंत ४५ लक्ष रु.पेविंग ब्लॉक बसवणे ८० लक्ष रु.पोहोच रस्ता तयार करणे ९० लक्ष रु.आणि सुशोभीकरण करून लेव्हलिंग पथदिवे बसवणे ६३ लक्ष रु.असे एकूण ४ कोटी १० लक्ष रु.अशाप्रकारे या चार ब वर्ग दर्जातील मोठ्या देवस्थानाचा विकास करण्यासाठी एकूण १६ कोटी रु.अशी घसघशीत रक्कम मंजूर झाली असल्यामुळे. या ठिकाणी येणार्या भाविक भक्तांना सुविधा मिळणार आहेत...त्यामुळे ..माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित दादा पवार,आणि ग्रामीण विकास मंत्री गिरीश महाजन आमदार पंकजाताई मुंडे यांचे विशेष आभार व्यक्त केले आहेत..

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904